राष्ट्रोध्दाराय तंत्र शिक्षणम्

महाराष्ट्र शासन

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५६५६२३४
E-mail : ropune@dtemaharashtra.gov.in
Web : www.ropune.org.in

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जा. क्र. : तंशिविकापु/आस्था-३(अ)/५०-५५/२०२२/2943 दिनांक : 23 JUN 2022

प्रति,

संचालक, अभियांत्रिकी महाविदयालय,पुणे
प्राचार्य,शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय,कराड
प्राचार्य,शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविदयालय,अवसरी
प्राचार्य,शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविदयालय,कराड
प्राचार्य,शासकीय तंत्रनिकेतन,पुणे/कराड/कोल्हापूर/सोलापूर/मिरज/अवसरी
प्राचार्य,शासकीय महिला निवासी तंत्रनिकेतन,तासगांव
प्राचार्य,शासकीय दूरशिक्षण तंत्रनिकेतन, पुणे
प्राचार्य, म.रा.इन्स्टि.ऑफ हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड केटरिंग टेक्नॉलॉजी, पुणे
उपसचिव, म.रा. तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय,पुणे

**विषय – तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत गट-अ व गट-ब च्या अधिकाऱ्यांची तसेच ग्रंथपाल व प्रोग्रामर या कर्मचाऱ्यांची वयाच्या ५०/५५ वर्षापलिकडे अर्हताकारी सेवेची ३० वर्षाची सेवा झाल्यावर सेवा पुनविलोकन करु न पात्र-अपात्रता अजमावण्यांसाठी करावयाच्या पुनर्विलोकनाबाबत**

....

संदर्भ- १) संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. ५/तंशिसं/५०-५५/२०२२/२७५, दिनांक १७/०६/२०२२

२) सामान्य प्रशासन विभाग यांचा शासन निर्णय क्रं.एलपीएल-२०१७/प्र.क्रं.२१/का. पंधरा/ दिनांक १०/०६/२०१९

उपरोक्त विषयाच्या संदर्भित शासन निर्णयानुसार आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील **ग्रंथपाल व प्रोग्रामर** या कर्मचाऱ्यांचे वयाच्या ५०-५५ वर्षापुढे शासकीय सेवेत राहण्याबाबतची पात्र/ अपात्रता अजमावून पहाण्यांच्या दृष्टीने सोबत जोडलेल्या विहित प्रपत्रात **ग्रंथपाल व प्रोग्रामर** कर्मचाऱ्यांची माहिती स्वतंत्ररित्या त्वरीत दिनांक २८/०६/२०२२ पर्यत या कार्यालयास सादर करावी. जेणेकरून या कार्यालयाच्या स्तरावर पुनर्विलोकनाबाबतची पुढील कार्यवाही करण्यात येवून मुख्य कार्यालयास अहवाल सादर करणे शक्य होईल. सदरची माहिती **Excell sheet Sakal Marathi** मध्ये तयार करावी

सोबत - वरीलप्रमाणे

(डॉ. द. व्य. जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत- या कार्यालयातील प्रोग्रॅमर श्री. शिंदे. स.बा यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.
त्यांना कळविण्यात येते की, सदर पत्र या कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावी.
प्रत - या कार्यालयातील आस्थापना ३(ब) विभागास माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४०५/४२५/४७२ ३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
ई-मेल—desk5@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

जा. क्र: ५/तंशिसं/५०-५५/२०२२/ २७५ दिनांक : 17 JUN 2022

प्रति,

१) सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर

२) सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
बांद्रा (पूर्व), मुंबई.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
21 JUN 2022
आवक क्र. 5770

विषय- तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत गट-अ, गट-ब च्या अधिकाऱ्यांची तसेच ग्रंथपाल व प्रोग्रामर या कर्मचाऱ्यांची वयाच्या ५०/५५ वर्षापलिकडे/ अर्हताकारी सेवेची ३० वर्षाची सेवा झाल्यावर सेवा पुनर्विलोकन करुन पात्र-अपात्रता आजमाविण्याच्या दृष्टीने करावयाच्या कार्यवाहीकरीता माहिती उपलब्ध करुन देणेबाबत.

संदर्भ- शासन निर्णय क्रमांक- एलपीएल-२०१७/प्रक्र.२१/का. पंधरा दि. १० जुन, २०१९

उपरोक्त विषयास अनुसरुन, संदर्भिय शासन निर्णयातील तरतूदीनुसार, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १०(४) व नियम ६५ मधील तरतूदीनुसार शासकीय अधिकारी / कर्मचारी यांच्या वयाच्या ५०/५५ व्या वर्षापलीकडे किंवा अर्हताकारी सेवेची ३० वर्षे पुर्ण झाल्यानंतर त्यांची शासन सेवा पुढे चालू ठेवण्याची पात्रापात्रता आजमाविण्यासाठी विहित निकषांच्या आधारे त्यांचे पुनर्विलोकन करुन, सुयोग्य व कार्यक्षम अधिकारी / कर्मचारी यानांच लोकहितास्तव शासन सेवेत पुढे चालू ठेवावे व अकार्यक्षम तसेच संशयास्पद सचोटी असणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांना मुदतपूर्व सेवानिवृत्त करणे संबंधीत कार्यपद्धती व कार्यवाही करणे बाबतच्या सुचना निर्गमित केलेल्या आहेत.

यास अनुसरुन तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत गट- अ व गट - ब अधिकाऱ्यांची वयाच्या ५०/५५ वर्षापलिकडे अर्हताकारी सेवेची ३० वर्षाची सेवा झाल्यावर तसेच ग्रंथपाल व प्रोग्रामर या पदावरील कर्मचाऱ्यांच्या वयाची ५५ वर्षापलिकडे सेवा पुनर्विलोकन करुन पात्र-अपात्रता आजमाविण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावयाची आहे.

आस्था-३अ/9
20/6/2022


D:\data\leenafolder\50-55 and note12\50-55 patra Officer\Letter 50-55 dte.docx

संदर्भाधिन शासन निर्णयाची प्रत शासनाच्या संकेत स्थळावरुन उपलब्ध करुन घ्यावी व शासन निर्णयातील मुद्दा क्र.२ मधील सेवा पुनर्विलोकनासंबंधी कार्यपध्दती व सर्वसाधारण सूचना विचारात घेऊन, आपल्या कार्यालयातील तसेच अधिनस्त शासकीय संस्थांतील गट-अ व गट-ब अधिका-यांची व ग्रंथपाल, प्रोग्रामर पदावरील कर्मचाऱ्यांची माहिती संकलीत करुन शासन निर्णयातील परिशिष्ट- ब मध्ये भरुन आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अर्वागनिहाय स्वतंत्र प्रस्ताव संचालनालयास दिनांक ०२.०७.२०२२ पर्यंत सादर करावा व सदर अधिकाऱ्यांचे / कर्मचाऱ्यांचे २०२१-२२ पासून मागील ५ वर्षाचे गोपनीय अहवालाच्या साक्षांकित प्रती सोबत जोडण्यात याव्यात. तसेच सदर प्रस्तावाची Soft Copy Excel Sheet ही Sakal Marathi हया Font मध्ये ई-मेल व्दारे सादर करण्यात यावी.

(प्रमोद नाईक)
सहसंचालक
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई

प्रत :
कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र.४,४अ व १२ यांना माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीकरिता त्यांना कळविण्यात येते की, संचालनालयातील अधिकारी/ कर्मचा-यांची माहिती उपरोक्तप्रमाणे माहिती सादर करावी.

## परिशिष्ट-ब

**१ ऑगस्ट रोजी वयाची ४९/५४ वर्षे पूर्ण झालेले गट______मधील शासकीय अधिकारी / कर्मचारी**

**१) विभागाचे नांव:-** **२) विभाग /कार्यालयाचे नांव:-**

**३) पदनाम:-**

| क्रमांक | शासकीय अधिकाऱ्याचे पुर्ण नाव व त्याने धारण केलेले पद | जन्म दिनांक | सेवेतील नेमणुकीचा दिनांक | वयाची ३५ वर्ष पुर्ण होण्यापूर्वी शासकीय सेवेत (भारतातील कुठलीही शासकीय सेवा धरुन) प्रवेश केला काय ? | विभागीय चौकशी / कार्यवाही चालू असल्यास त्या संबंधीचे आरोप व त्याची सद्य:स्थिती यांचा तपशील | मागासवर्गीय असल्यास कोणत्या वर्गात मोडतात | शारीरिक दृष्टया शासकीय सेवेत राहण्यास पात्र आहेत काय? | इतर अभिप्राय असल्यास |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | | | |

*******